VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार : वामन कर्डक

डॉ. लहू दिगंबर वाघमारे
(मराठी विभाग )
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव.
ता.चाकूर. जि. लातूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य कर्तृत्वाचा व विचारांचा वारसा जतन करून पुढील पिढ्यांकडे सुपूर्त करणारे थोर लोककवी वामनदादा कर्डक हे तमाम मराठी विश्वाला सुपरिचित आहेत .नव समाज व नवराष्ट्र निर्मितीचे बाबासाहेबांचे क्रांतिकारी विचार , त्यांच्या विविध चळवळी, त्यांचे झुंजार व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या पश्चात आंबेडकरी चळवळीची झाली वाताहात वामन कर्डक यांनी अत्यंत संवेदनशीलतेच्या पातळीवर मांडले आहे. या पवित्र कार्यासाठी त्यांनी स्वतःला सर्वस्व झोकून दिले. त्यासाठी त्यांनी व्यक्तिगत सुखदु:खाचाआणि घरसंसार व प्रपंच याचाही विचार केला नाही. अजन्म अखंडितपणे त्यांनी हे लेखनकार्य सुरू ठेवले. ते केवळ कवीच नव्हते. तर एक प्रसिद्ध प्रबोधनकार व शाहीर होते. वामन कर्डक हे शहिरांच्या दुसऱ्या पिढीतील ज्येष्ठ लोकशाहीर आणि लोककवी होते. त्यांनी शाहीर भीमराव कर्डक, शाहीर घेगडे शाहीर आंढागळे या पहिल्या पिढीतील शहिराकडून प्रेरणा घेऊन प्रथम छोट्या छोट्या मेळाव्यातून त्यांनी आपली भीम गीते सादर केली व आंबेडकरी गीते लोकप्रिय केली.आंबेडकरी तत्त्वज्ञान, संकल्पना आणि सिद्धांताचे मूलस्थान मांडणारी, प्रचार आणि प्रसार करणारी ही त्यांची नवी कविता एका नव्या साहित्यिक जडणघडणीची, जनजागरणाची जणू पर्वणीच होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाला आणि व्यक्तिमत्त्वाला अजरामर करणाऱ्या काही काव्यपंकतीच्या आधारे त्यांच्या कवितेचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल. आदर्श मातापित्यांच्या पोटी बाबासाहेबांचा जन्म झाला ही घटना कोट्यावधी दलित-शोषित पीडितांसाठी अत्यंत फलदायी आहे. युगानुयुगेयांच्या अन्याय अत्याचाराला मिटून गुलामगिरीच्या जोखडातून बंधमुक्तकरणा-या या महान क्रांतिकाकाचा जन्म कोट्यवधी लोकांसाठीसुद्धा महत्त्वपूर्ण ठरला .ही भावना प्रकट करताना कवी वामन कर्डक म्हणतात

'चकित झाले अंबर' या काव्य गीतात लिहतात

'दिन भाग्याचा आज दीनांचा जन्मदिन हा माझ्या भिमाचा
आनंदाचा समय सणाचा
रंग बदलला य भुवनाना
वारा रंगला नाचू लागला असा सोहळा

बाळ भिमाच्या जन्माने भारतभूमीला हर्ष झाला होता. फुलांना बहर आला होता .भीम जन्माने सृष्टीला झालेला आनंद प्रकट करताना वामनदादांच्या लेखणीला बहर आला आहे. बाबासाहेबांनी अथक परिश्रमाने विद्या ग्रहण केली. एक एक पदवी बहाल करीत ते जगद्विख्यात ठरले. देश-विदेशातील सर्व पदव्या प्राप्त केल्यावर त्यांनी जगभरातील सर्व ज्ञान शाखांचाही कसून अभ्यास केला व सबंध जगात ते विद्वान ठरले. या ज्ञानाच्या आधारे त्यांनी आपल्या कोट्यवधी अस्पृश्य व शोषित देशबांधवांनान्याय व हक्क बहाल केले. त्यांना हजारो वर्षाच्या गुलामीच्या साखळदंडातुन मुक्त केले. हा बाबासाहेबांचाक्रांतीलढा व महान कार्य विशद करताना 'भिमा तुझ्या जन्मामुळे' या कवितेत ते लिहितात उद्धारली कोटी कुळे भिमा तुझ्या जन्मामुळे जखडबंद पायातील साखळदंड तटातट

सुटले तू उठताच बंड
झाले गुलाम मोकळे

भीम तुझ्या जन्मामुळे ' बाबासाहेबांनी या देशातील बहुजन समाजाच्या कोटी कोटी कुळांचा उद्धार केला. म्हणून या पृथ्वीतलावर बाबासाहेबांचे नाव अजरामर झाले .अस्पृश्यांचे जिने कवडीमोल होते. त्यांना विकासाच्या व प्रगतीच्या मार्गाने नेण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले. त्यांचे अत्यंत काव्यात्मक वर्णन कवीने प्रस्तुत काव्यपंक्तीतून केले आहे .बहुजनांच्या उध्दारासाठी बाबासाहेबांनी क्रांती केली.त्याला कोट्यवधी आपले अनुयायी जोडले. आणि हे लढे यशस्वी केले. त्यातीलच एक 'महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह' आहे .या देशातील दलित अस्पृश्यांना पशुपेक्षाही हीन लेखले गेले.साधे निसर्गाचे पाणीही त्यांना पिता येत नव्हते. या देशातील तथाकथित मणूप्रणित व्यवस्थेने त्या पाण्यावरही बंदी घातली होती. म्हणून पाण्याविना येथील दलित माणसांना प्राण गमवावा लागत होता. हे निसर्गाचे पाणी त्यांना मिळवून देण्यासाठी लढा उभारणाऱ्या बलदंड बाबासाहेबांचे आणि त्यांच्या क्रांतीलढयाचे वर्णन करताना ते लिहितात.

बलवान गडी बलदंड
जणू पोलादाचा पिंड
हलविण्यास भारत खंड
ठोकुनी आपला दंड
भीमगर्जना करीत होता महाडच्या मैदानी !

या काव्यपंक्तीतून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्या कार्याचे ज्वलंत चित्रण आले आहे.

माणगाव परिषद बाबासाहेबांच्या नेतृत्वाला एका विशिष्ट दिशेकडे घेऊन जाण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे .छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाला सांगितले की. "आता तुम्हाला तुमचे नेतृत्व सापडली आहे बाबासाहेब हेच तुमचे नेते आहेत त्यांच्या पाठीशी तुम्ही खंबीरपणे उभे राहिले पाहिजे "यानंतर बाबासाहेब केवळ अस्पृश्यांचेच नाही तर सबंध भारतातील बहुजनांचे नेते म्हणून राष्ट्रीय स्तरावर नावारूपाला आले आणि या देशातील तथाकथित नेतृत्व करणारे सर्व नेते फिके पडले. या बाबासाहेबांच्या नेतृत्वाचे गौरवास्पद वर्णन करताना कवी 'नेते 'या कवितेत लिहितात

"नेते बापुडे फिके पडतील हे बडे बडे
माझ्या भीमाच्या कीर्तीपुढे

बाबासाहेबांनी उभारलेले लढे हे समतेच्या नव्या भारतासाठी उभारले होते. राष्ट्रीय एकात्मता, समता आणि बंधुतानिर्माण करण्यासाठी उभारले होते, त्यांच्या पाठीमागे एक सहिता एक तात्विक अधिष्ठान आणि या देशातील मानवतावादी व परिवर्तनवादी महापुरुषांचेसमतावादी तत्वज्ञान होते. मानव जातीच्या प्रगतीला चालना देणाऱ्या बुद्ध, कबीर आणि महात्मा फुले यांना त्यांनी गुरुस्थानी मानले. आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविला. त्यांचे हे गुरू-शिष्याचे नाते व त्यांच्या विचारांचे बाबासाहेबांनी केलेले कार्य विशद करताना 'वारसा ' या कवितेत कवी लिहितात गौतमाचा महात्मा फुलेंचा वारसा चालविला भिमाने जीर्ण मतवादी साराच भारत गदगदा हलवला भिमाने हजारो वर्षांपासून जातिव्यवस्थेने या देशाला पोखरून काढले होते. अनेक जातींमध्ये देश विभागला गेला होता. त्यामुळे देश परकीयांच्या ताब्यात गेला होता .देशाच्या प्रगतीला मारक ठरणारी ही जातीभेदाची व विषमतेची व्यवस्था या महापुरुषांच्या विचारांनी बाबासाहेबांनी नष्ट केली आणि हा देश राष्ट्रीय एकात्मतेने व अखंडतेने नटविला. जातिभेद रूढी-परंपरा आणि कर्मकांडांने बरबटलेला हा देश विज्ञाननिष्ठ व विवेकनिष्ठ बनवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यापूर्वी किती तरी वर्ष त्यांनी बुद्धांचाधम्म तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता बुद्ध धम्मातील स्वातंत्र्य समता बंधुता आणि समान न्याय ही तत्वे या देशाला समताधिष्ठित बनवण्यासाठी उपयुक्त ठरतील असा विश्वास त्यांना म्हणूनच नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसह सोबत त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो समाजबांधवांना विकासाचा मार्ग दाखविला. ही घटना वामन कर्डक यांना अत्यंत महत्त्वपूर्ण वाटते .या मंगल प्रसंगाचे वर्णन करताना "तो भारताचा वाली "या गीतात ते लिहितात तो भारताचा वाली

एकोणीसशे छप्पन्न साली
त्या बोधीवृक्षाखाली
आम्ही पाहिला
दीक्षा घेता मंगलकाली बोल बोलताना पाली
त्या बोधीवृक्षाखाली
आम्ही पाहिला

समतेवर आधारलेल्या या धम्म तत्वज्ञानाच्या आधारे बाबासाहेबांनी अखंड भारत निर्माण केला. हिंदू धर्माच्या जोखडातून पशूपेक्षापेक्षा हीन जीवन जगणाऱ्या लाखो अनुयायांना बाबासाहेबांनी दिलेला हा प्रगतीचा धम्म भारताच्याच नव्हे तर जगाच्या कल्याणासाठी फलद्रूप ठरला आहे. धम्म तत्वज्ञान , जातिभेद ,रूढी, परंपरा ,कर्मकांड आणि कोणत्याही प्रकारची विषमता नाही तर विज्ञाननिष्ठ आणि मानवी प्रगतीला साह्यभूत ठरणारी आदर्श मूल्ये बुद्धांनीजगाला दिली .म्हणून ते अखिल मानवजातीसाठी उपयोगी ठरणारे आहे .असे वामनदादांना वाटते. ते 'बुद्धाच्या चरणी' या का काव्यगीतात लिहितात ,

सारे मानव प्राणी
ना उच्च-नीच कोणी कोणीही यावे शुद्ध
बनावे बुद्धाच्या चरणी
इथे नाही जातीयवाद ना
पोकळ वर्णभेद
सर्वांवरती करितो प्रीती
माझा गौतम बुद्ध
दार खुले हे सर्वांना ,शूद्रांनाचांडाळांना
साळी माळी ब्राह्मण कोळी
विलीन व्हारे त्रिशरणी

अखिल प्राणिमात्रांना सुखाने जगण्याची हमी देणारा हा धम्म बाबासाहेबांनी घेतला. याचे वर्णन करताना वामनदादा च्या लेखणीला बहर येतो. बाबासाहेबांनी संविधानाचे लेखन करतानाही या धम्म तत्त्वाचांच समावेश यात केला आहे .म्हणजे बुद्धाचा धम्म हा संविधानाच्या रूपाने संबंध

भारतवासीयांना त्यांनीदिला आहे. हे वामनदादा आपल्या कवितांतून विशद करतात बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या बौद्धधम्माची व धम्मज्ञानाची प्रसार करणारी अनेक गीते वामन कर्डक यांनी लिहिली. नवापूर ,त्रिशरणाची वीणा, पंचशील मज तारती, बुद्धाच्या चरणी, प्रेमाने जिंकले जगा, समतेची शाल निळी ,गौतम तुझी गोडी यासारख्या कितीतरी गीतातून त्यांनी हे तत्त्वज्ञान व धम्माचरण विशद केले आहे .बाबासाहेबांच्या क्रांती लढ्यामुळे अस्पृश्य समाजाला आत्मभान आले. तो संघर्षासाठी सज्ज झाला त्याच्यात स्वाभिमानी वृत्ती निर्माण झाली .भाकरी पेक्षाही त्याला स्वाभिमान महत्त्वाचा वाटला .त्याची संघर्षशील वृत्ती ,त्याच्या या संघर्षशीलतेचे ,स्वाभिमानाचे व निर्भीड आत्मविश्वासाचे अत्यंत समर्पक चित्रण वामन कर्डक यांनी पुढील काव्यपंक्तीतून केले आहे. 'आम्ही तुफानातले दिवे' या काव्यातील पुढील काव्यपंक्ती मधून हे विशद केले आहे. तुफानातले दिवे आम्ही

तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊस धारा
मुळी ना आम्हा शिवे
हल्यावरती होती हल्ले
अभंग आमचे बालेकिल्ले
असाच ताठर माथा आमचा जरान खाली दिवे

वामन कर्डकांना प्रस्तुत काव्यपंक्तीमधून स्वाभिमानाची व संघर्षाची नवी प्रेरणा मिळाली. त्यातून अनेक भीमसैनिक उदयाला आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंबेडकरी क्रांती चळवळ उभा केली महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन यांसारख्या एकापाठोपाठ एक अनेक क्रांत्या घडविल्या. त्यातून अस्पृश्य समाज खडबडून जागा झाला आणि संघर्ष करून आपले न्याय्य हक्क त्यांनी मिळविले .भारतातच नाही तर संपूर्णजगात बाबासाहेबांच्या विद्वतेचा प्रभाव निर्माण झाला आणि युगायुगाची गुलामगिरी संपुष्टात आली .परंतु डॉ. बाबासाहेबांच्या पश्चात मात्र अस्पृश्य समाजाचे विघटन झाले दलित नेते अनेक गटात विभागले गेले. स्वार्थी व नकली पुढाऱ्यांना उत आला. ते अनैतिक बनले .त्यामुळे सबंध अस्पृश्य समाजही त्याचे अनुकरण करु लागला. तोही बाबासाहेबांच्या तत्वांपासून कोसो मैल दूर राहू लागला. त्यामुळे बाबासाहेबांच्या अनुया यातील नेते पुढारी आणि समाजबांधव यांची पडझड सुरू झाली. आंबेडकरी चळवळीतील या पडझडीचे अत्यंत करूनपणे चित्रण वामन कर्डक केले आहे. 'भिमरायाचा मळा ' या काव्यात ते यासंदर्भात लिहितात,

कोण राखील आता हा भिमाचा मळा
वाळूने चालला हा उभा जोंधळा

बाबासाहेबांच्या समाजरुपी शेतमळयाचे एवढे ज्वलंत काव्य संबंध भीमकाव्यात अपवादानेच आढळेल जो तो स्वार्थाच्या मागे लागला. बाबासाहेबांच्या तत्वांची पायमल्ली करू लागला. म्हणून बाबासाहेबांनी ज्या समाजाच्या प्रगतीच्या मळा फुलविला होता. त्या मळ मळ्याची अक्षरश धूळधाण झाली .तेव्हा वामन कर्डक यांना कोट्यवधी पामराची आई झालेल्या भिमाची अर्थात बाबासाहेबाचे व त्यांच्या कार्याचे स्मरण होते .हे स्मरण कथन करताना

'भीम माझा कसा होता 'या गीत काव्यातील काव्यपंक्ती ते
लिहितात "काय सांगू तुला आता
भीम माझा कसा होता लेकराला जोशी माता
भीम माझा तसा होता

या कोटी कोटी पामरांचा सखा होऊन जगणारा भीम वामन कर्डक यांनी अत्यंत काव्यात्मक पद्धतीने आपल्या 'असा भीम होता' या काव्यात शब्दबद्ध केला आहे .उपाशी जगाचा असा भीम होता

असा भीम होता असा भीम होता

बाबासाहेबांच्या पश्चात वामन कर्डक यांना बाबासाहेबांच्या कार्याची व कर्तृत्वाचे होणारे हे स्मरण कोणत्याही वाचक अनुयायांना सद्गदित करून सोडणारे आहे बाबासाहेबांच्या हयातीतच त्यांच्या समाजबांधवावर कोणीही अन्याय करण्यास धजत नव्हते .बाबासाहेबांचा या देशातील सर्व धर्ममार्तंडावर आणि मनुवादी गुंडांवरवचक होता. परंतु त्यांच्या पश्चात मात्र या समाजाचे रक्षण करण्यासाठी कोणीही उरला नाही. म्हणून या समाजावर अमानुष अत्याचार होऊ लागले.

हत्याकांड होऊ लागले. दिवसाढवळ्या बलात्कार होऊ लागले. त्यांना जिवंत मारण्यात येऊ लागले.अशा अत्यंत हृदयद्रावक घटनेचे चित्रण

पाहिले ना जे कधी ते
आज आम्ही पाहतो
जात असता माऊलीची
लाज आम्ही पाहतो

अशा शब्दात त्यांनी केले आहे. आया-बहिणींची अब्रू लुटली जात असतानाही अस्पृश्य समाज संघ आणि थंड होता. समाजातील षंड अस्पृश्य पुरुष केवळ स्वार्थाच्या पाठीमागे लागले आहेत. त्यांना या घटनेचे काही देणेघेणे नाही.

ते नेतृत्वासाठी आणि आपल्या सामाजिक अस्तित्वासाठी कोणत्याही थराला जात आहेत. आपापसात भांडत आहेत . त्यांच्या असंघटितपणामुळे समाज दिशाहीन बनला आहे .अशा संघटित नसलेल्या बाबासाहेबांच्या अनुयायांना संघटित होण्याचे आवाहन करताना' सांगू किती मी दादा' या भीम गीतात वामन कर्डक लिहितात

सांगू किती मी दादा
एकतेने येथे नांदा
या रे सारे भाऊ भाऊ प्रेमभावे येथे राहू
तुटले दुबेहे सांधा

बहुजन समाजातील विघटित नेतृत्व य व त्यामुळे झालेली समाजाची धूळधाण याचे हे काव्य वाचकांना अंतर्मुख करते. याशिवाय अस्पृश्य समाजातील सामाजिक शोषणाबरोबरच त्यांच्या आर्थिक शोषणालाही कारणीभूत ठरलेली ही मनु प्रणित समाजरचना वामन कर्डक यांनी जिवंतपणे मांडली आहे. भारतातील अस्पृश्यांचे सामाजिक व आर्थिक या दोन्ही स्तरावर होणारे शोषण या देशात विषमता वाढविणारे आहे. आर्थिक विषमतेमुळे अस्पृश्य समाज दारिद्र्यात लोटला गेला. त्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न या विषम समाजव्यवस्थे समोर व्यक्त करताना वामन कर्डक लिहितात,

सांगा आम्हाला बिर्ला बाटा कुठाय हो
सांगा धनाचा साठा आमचा
वाटा कुठाय हो

सामाजिक विषमतेबरोबर निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेचे अत्यंत जीवंत आणि दाहक चित्रण वामन कर्डक यांनी या काव्यपंक्तीतून केले आहे. आंबेडकरी चळवळीतील या प्रमुख विषयांबरोबरच बाबासाहेबांची राष्ट्रनिष्ठा, त्यांचे संबंधबहुजन समाजाप्रती असलेले कार्य, त्यांच्या अनुयायांची व नेते पुढाऱ्यांची लाचारी ,त्यामुळे या देशात सुरू झालेले विषमतेचे वातावरण, या सर्वांना सावरण्यासाठी बाबासाहेबांसारख्या कर्तृत्ववान पुढाऱ्याच्या जन्माची आवश्यकता यासह इतरही अनेक विषय त्यांनी आपल्या काव्यातून प्रकट केले आहेत. त्यांच्या या काव्य लेखनाची भाषा साधी सोपी सर्वसामान्यांना आकलन होईल अशी असून सुद्धा ती काव्यात्म , अर्थपूर्ण व लालित्यपूर्ण ठरली आहे. आशय अभिव्यक्तीचे अभिनत्व साधल्यामुळे या काव्यात सौंदर्यही प्राप्त झाले आहे . आजच्या विदारक सामाजिक स्थितीला सावरण्यासाठी हे काव्य दिशादर्शक ठरले आहे.

संदर्भग्रंथ

1) वामन कर्डक, 'मोहोळ' 'शब्ददान 'प्रकाशन नांदेड, द्वितीय आवृत्ती ,एप्रिल, 2014.
2) प्रा. बाबा बोराडे, आंबेडकर लोकशाहीर वामन कर्डक , आनंद प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती डिसेंबर 2013 .
3) वामन कर्डक, माझ्या जीवनाचं गाणं, (आत्मकथा) शब्दांकन- प्रा. रविचंद्र हडसनकर शब्दज्ञान प्रकाशन , नांदेड आवृत्ती एप्रिल 2010

ISSN 2349-638X
www aiirjournal.com